पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १/६/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. २६९

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे एप्रिल २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/११४ दि.२४/५/२०२१ चे पत्र.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. २७०

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

गेले दीड वर्ष कोरोनाच्या या संसर्गजन्य महामारीला आपण सामोरे जात आहोत. या महामारीची पहिली लाट झाली दुसरी लाट देखील खूप भयानक असून त्यात पुणे शहरातील बाधित झालेल्या रुग्णांच्या संख्येचा एका दिवसाचा उच्चांक हा ७२०० इतका गाठला होता. परंतु पुणे शहराचे महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेते, आयुक्त, पदाधिकारी संपूर्ण आरोग्य कर्मचारी यांच्या योग्य व कार्यतत्पर नियोजनामुळे काल दिनांक २४ मे २०२१ रोजी ची बाधित झालेली संख्या हि ५०० ते ६०० च्या आत आणण्यात यश आले आहे.

या महामारीच्या काळात पुणे मनपा च्या आरोग्य विभाग प्रमुख ते शेवटच्या स्तरातील कर्मचारी यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आपला जीव धोक्यात घालून केलेल्या कामासाठी त्यांना त्यांच्या कामाची पोचपावती म्हणून व खासबाब म्हणून त्यांना वेतनवाढ देण्यात यावी.

या पूर्वी सन २००८ मध्ये पुणे शहरातील बालेवाडी येथे कॉमन वेल्थ गेम्स चे आयोजन करण्यात आले होते तेव्हा पुणे मनपा च्या सर्व व्यवस्थापन टीम ने चांगली कामगिरी केल्या बद्दल त्यांना खासबाब वेतनवाढ देण्यात आली होती त्याच धर्तीवर आरोग्य विभाग प्रमुख ते शेवटच्या स्तरातील कर्मचारी यांना खासबाब म्हणून वेतनवाढ देण्यात यावी.

विषय क्र. २७१

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२०२२ अंदाजपत्रक, यादी क्र. बजेट कोड नं. CE22A704/SJ20-1352, प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर समाजमंदिराचे उर्वरित कामे करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१. प्रभाग क्र. २ अ नागपूर चाळ व परिसरात रस्ते विकसित करणे | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| २. प्रभाग क्र. २ अ विविध ठिकाणी रस्ते देखभाल व दुरूस्ती करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

विषय क्र. २७२
मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२०२२ अंदाजपत्रक, यादी क्र. बजेट कोड नं. CE22A704/SJ20-1293, प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित कामे करणे | २५ लाख | --- |
| <u>नविन सुचविलेली कामे</u> | | |
| ३. प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथे समाजमंदिराची उर्वरित कामे करणे. | --- | १० लाख |
| ४. प्रभाग क्र. २ अ मधील विविध आरोग्य कोठी व समाजमंदिराची देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | --- | ५ लाख |
| ५. प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथे सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

## माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. २७३

दि. १५/३/२०२१ ते दि. २१/३/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ८९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/११३ दि. २४/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. २७४

दि. १/३/२०२१ ते दि. ७/३/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ८० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/११५ दि. २४/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. २७५

उप आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड व कोथरुड-बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/४/२०२१ ते ३०/४/२०२१ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/११६ दि.२४/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. २७६

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/४/२०२१ ते दि.३०/४/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/१२१ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. २७७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. ७/३/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ७/३/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४३८ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ७,७१,८२४/- चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २७८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. १४/३/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १४/३/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४३९ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४,४३,३२७/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २७९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. २१/३/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/३/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४० दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,९८,८५,९६९/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २८०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. २/१/२०२१ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४१ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,१५,९१५/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २८१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. ९/१/२०२१ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ९/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४१ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ८,३२,५६६/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २८२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. १६/१/२०२१ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १६/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४३ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४३,४९,०९०/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २८३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. २३/१/२०२१ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २३/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४४ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ६,९९,१९०/– चा तक्ता माहितीसाठी.

विषय क्र. २८४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५(१) अन्वये दि. ३०/१/२०२१ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३०/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४४५ दि.२०/५/२०२१ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४,३०,२७७/– चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

विषय क्र. २८५

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील पेठ बाणेर अे फॉर्म क्र. ३३५७ सन २०१३–२०१४ मधील मिळकतीची आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/४३४ दि. २०/५/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २ सन २०२१–२०२२ चा विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. २८६

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. २८७

पुणे पेठ पाषाण येथील मासेमारी तलाव ठेकेदार प्रियदर्शनी मच्छीमार सहकारी मागासवर्गीय संस्था मर्यादित यांस दि. ७/५/२०१५ ते २८/२/२०१८ या मासेमारी मक्त्याचे जलपर्णी असल्यामुळे मासेमारी बंद असल्याने सदर कालावधीतील ३४ महिन्याचे भाडे र.रु. ९,३७,८२२/– माफ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/४१ दि.३/५/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. २८८

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत (१) श्रीशिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह तळजाई पायथा,पुणे. (२) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु.पुणे. (३) पुणे विद्यार्थी गृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर,पुणे. (४) गेणुजी बेलदरे मनपा शाळा, जांभुळवाडी रोड, पुणे. (५) अभिनव इंग्लिश स्कुल,स.नं.१३,कात्रज बायपास रोड, आंबेगाव बुद्रुक,पुणे–४६ येथे स्थापित करण्यात आलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/अर्वटेड केंद्र येथे दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन दुपारचा चहा,लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट गरजेनुसार बिस्लरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे, अर्वटेड सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील सामान हलविणे, स्थापत्य विषयक कामे करणे व काही वस्तु (सन २०१९–२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे इत्यादि कामे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन (प्रोप्रा. कृष्णा माळी) यांचेकडून दि.०९/०४/२०२० पासून दि. ०९/०२/२०२१ पर्यंत करुन घेण्यात आल्याने तसेच अर्वटेड सेंटर येथील साफसफाई ठेकेदार मे. शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि. २३/०४/२०२० पासून दि.३०/०७/२०२० पर्यंत ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये एकुण र. रु. १,८४,६०,४१०.४७ पर्यंत करुन घेण्यात आल्याने सदर बाबीस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदर बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/५१ दि.४/५/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.